**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**दिनांक १५ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात आणण्याची अपेक्षा राष्ट्रपतींकडून व्यक्त**

2. **महसूल अधिकारी हे नागरिक आणि सरकार यांना जोडणारा सेतु असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं एनएडीटीच्या प्रशिक्षणार्थी समारोप सोहळ्यात प्रतिपादन**

3. **अमरावतीमधल्या अल्पवयीन मुलींच्या छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी SIT ची स्थापना**

4. **अकोल्यासह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात उष्णतेची लाट आता सविस्तर बातम्या .......**

**राष्ट्रपति एम्स**

तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातल्या आरोग्य व्यवस्थेतली दरी संपुष्टात यायला हवी अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. त्या अनुषंगानं नागपूर एम्स काम करत आहे, असं त्या म्हणाल्या. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. देशातल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत अनेक उपाययोजना आखल्या आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या. यावेळी त्यांनी आयुष्मान भारत जन आरोग्य योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही उल्लेख केला

वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावी वृत्तीसोबतच आयुष्यभर शिकत राहण्याची जिद्द हवी. वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे स्थान सर्वतोपरी आहे. जिज्ञासा, संशोधन आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती आत्मसात करा. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्ण केंद्रित दृष्टिकोनाची जागा घेऊ शकत नाही, असं प्रतिपादन मुर्मू यांनी यावेळी केलं. यावेळी राष्ट्रपतींनी आठ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान केली. यावेळी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण 210 विद्यार्थ्यांना एम्सचे अध्यक्ष अनंत पंढरे यांच्याद्वारे पदवी प्रदान करण्यात आली सुवर्णपदक प्राप्त ८ विद्यार्थ्यांपैकी 6 मुली आहेत हे फडणवीस यांनी आपल्या भाषणात आवर्जून सांगितलं तर 2014 पासून एमबीबीएस पदवी आणि पदव्युत्तर जागांची संख्या दुप्पट झाली असून आता देशात एम्सची संख्या 23 झाली असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली .

**राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी**

महसूल अधिकारी हे नागरिक आणि सरकार या मधले सेतू असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीत अधिकारी प्रशिक्षार्थ्यांच्या समारोप समारंभा आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मुख्य उपस्थितीत पार पडला, त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी राज्यपाल जिष्णू देव वर्मा , राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ -सीबीडीटीचे अध्यक्ष रवी अग्रवाल , एनएडीटीचे महासंचालक सीबेश्चियन के मॅथ्यूज उपस्थित होते .महसूल अधिकाऱ्यांचे वर्तन संतुलित आणि लोकाभिमुख असण्यावर राष्ट्रपतींनी विशेष भर दिला. देशात अनेक करविषयक सुधारणा होत असून यामुळे नागरिकांचा कर प्रणाली आणि सरकारवर विश्वास वाढत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. या सुधारणा नागरिक आणि सरकार यामध्ये अधिक पारदर्शकता आणत असल्याच त्यांनी सांगितलं.तत्पूर्वी, भारत जागतिक स्तरावर महासत्ता होण्याच्या दिशेने प्रवास करत असून हीच ती वेळ आहे जेव्हा महसूल अधिकारी देशाच्या प्रगतीत अधिकांश योगदान देऊ शकता असं आवाहन राज्यपाल यांनी केलं. आपण देशाची आर्थिक व्यवस्था अधिक सक्षम करणारे अधिकारी व्हावे अशी अपेक्षा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमात 11 उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्ण पदक करण्यात आल. त्यानंतर सर्व नवं अधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली.

**राष्ट्रपती वर्धा दौरा**

उद्या दिनांक 16 एप्रिल रोजी सकाळी साधारणता ११ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू , वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम आश्रम, बापुकुटी इथं भेट देणार आहे. त्यांनतर त्या सकाळी साडे अकरा वाजता महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात पदवीदान समारंभास उपस्थित राहतील.

**किरेन रिजिजू**

महिला आरक्षण विधेयक समतोल असून प्रत्येक राज्याच्या, समुदायाच्या आणि प्रदेशाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी समर्थ असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयकातल्या दुरुस्त्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पारित करण्यासाठी उद्यापासून संसदेचं विशेष अधिवेशन सुरु होणार असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. या विधेयकामुळे महिलांना संसद आणि राज्य विधान सभांमध्ये तेहतीस टक्के आरक्षण लागू होणार आहे. लोकसभेत हे विधेयक उद्या मांडल जाईल, त्यावर अठरा तास चर्चा अपेक्षित आहे, तर राज्यसभेत दहा तासांची चर्चा ठेवण्यात आल्याचं रिजिजू म्हणाले .

**सम्राट चौधरी**

बिहारचे चोवीसावे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते सम्राट चौधरी यांनी आज शपथ घेतली आहे. पाटणा इथं आयोजित एका कार्यक्रमात राज्यपाल सय्यद अता हसनैन यांनी त्यांना पद

आणि गोपनियतेची शपथ दिली. संयुक्त जनता दलाचे ज्येष्ठ नेते विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यादव यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २६ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या मालिकेचा १३३ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांना आपल्या सूचना आणि विचार एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य शून्य, या नि:शुल्क क्रमांकावर, माय जीओव्ही ओपन फोरम किंवा नमो ॲप वर नोंदवता येणार आहेत.

**लैंगिक छळ प्रकरण/प्यारे खान**

अमरावती मधल्या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी SIT अर्थात विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. १० पोलिस अधिकारी आणि ३६ कर्मचारी अचलपूरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणाची चौकशी करणार आहेत.परतवाडा भागात हा प्रकार उघडकीस आला . याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह एकूण ४ जणांना अटक केली आहे. त्यांनी सुमारे १८० अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ काढले. त्यानंतर या व्हिडीओच्या आधारे त्यांना ब्लॅकमेल केलं आणि वेश्या व्यवसायात ढकललं असा आरोप आहे. अचलपूर नगरपरिषदेनं आरोपीच्या घराचं अवैध बांधकाम तोडलं आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज अचलपूर-परतवाडा शहरातली बाजारपेठ पूर्णतः बंद ठेवण्याचा निर्णय विविध सामाजिक संघटनांनी घेतला आहे.दरम्यान आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी अल्पसंख्यांक आयोगाची भूमिका असल्याचं अध्यक्ष प्यारे खान यांनी स्पष्ट केलं आहे........

**प्रताप सरनाईक**

वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आर्थिक कामगिरीबाबत परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष  प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट भूमिका मांडत तोटा कमी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते.  या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चालनीय उत्पन्न ११ हजार ४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२ हजार ६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला तब्बल ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. राज्यातील एकूण ३१ विभागांपैकी  जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात असून  उर्वरित २३ विभाग तोट्यात आहेत.

**वाघ हल्ला**

भंडारा जिल्हयाच्या साकोली तालुक्यातल्या वीरशी इथं झोपेत असलेल्या एका ५ वर्षाच्या मुलावर हल्ला करत आज एका वाघिणीनं त्याला ठार केलं. गेल्या महिनाभरात या वाघिणीनं अशा प्रकारचे ४ हल्ले केले असून त्यात तिघे जण ठार तर एक जण जखमी झाला आहे.

**आकाश निरीक्षण**

आकाश निरीक्षणाची आवड असलेल्या नागरिकांना  येत्या १८ एप्रिल  रोजी पहाटे 'प्लॅनेट परेड' अर्थात ग्रहांची रांग पाहायला मिळणार आहे. या वेळी बुध, मंगळ, शनि आणि नेपच्यून हे ग्रह पूर्व दिशेला एकाच रेषेत जवळजवळ दिसतील . अनेक ग्रह एकाच वेळी आकाशात एकाच दिशेत दिसण्याच्या या घटनेला 'प्लॅनेट परेड' म्हटल जात. प्रत्यक्षात हे ग्रह एका सरळ रेषेत नसले तरी पृथ्वीवरून पाहताना ते एकाच भागात असल्याचा भास होतो.  या पार्श्वभूमीवर मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागांतर्गत कार्यरत स्टार गेझर क्लबतर्फे ऑर्किड स्कूल इथं  शालेय विद्याथ्यांसाठी विशेष आकाश निरीक्षण कार्यक्रमाच आयोजन करण्यात आल आहे. ही खगोलीय घटना पहाटे ०४.४५ ते ०५.२० या वेळेत पूर्व ते ईशान्य दिशेदरम्यान क्षितिजाजवळ पाहायला मिळणार आहे

**हवामान**

मागील 24 तासात विदर्भातील अकोला जिल्हा  कर्नाटकातील कालाबुर्गीसह ४४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवत देशातील सर्वात उष्ण जिल्हा ठरला आहे. त्या पाठोपाठ अमरावती इथं  43. 8 आणि वर्धा इथं 43. 5 इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपूरसह यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम हे जिल्हे 42 अंश सेल्सिअसच्या घरात असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 40 आणि 41 अंश सेल्सिअस आहे. आज अकोला जिल्हयात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला असून उद्या अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्हयात उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  आज देखील अकोला इथं ४४ पूर्णांक २ आणि नागपुरात ४२ पूर्णांक ६ दशांश अंश इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. दरम्यान अकोला शहरात अगर वेस भागात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. हा मृत्यू उष्माघातानं झाल्याचा संशय आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होणार आहे, असं पोलिसांनी सांगितलं

****